तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in

अतितात्काळ

क्रमांक : 10/एनजीपी/पदविका प्रस्ताव सुनावणी /2012/ 9309
दिनांक : 19 DEC 2012

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे

विषय : अॅप्रुव्हल प्रोसेस 2013-14
संदर्भ : 1. शासन निर्णय क्र. सीटीसी 2011/(प्र.क्र. 42/141) तांशि 4, दि. 24.1.2012
2. अधिसूचना क्र. 10/एनजीपी/2012/अॅप्रुव्हल प्रोसेस/1358, दि. 14.12.2012

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन अधिसूचनेन्वये, पदविका व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांमार्फत परिषदेकडे सादर केलेल्या अर्जावर शासनाचे अभिप्राय / शिफारस परिषदेस सादर करण्याकरीता संबंधीत संस्थांना या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता www.dte.org.in/courseapproval2013 ही लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच या संचालनालयामार्फत देण्यात आलेला सांकेतांक व पासवर्डद्वारे ऑनलाईन भरुन सदर माहिती दिनांक 31.12.2012 पर्यंत भरण्याबाबत व ज्या संस्थामार्फत संचालनालयाच्या संकेतस्थळावर ऑन लाईन पध्दतीने माहिती भरण्यात येईल अशा संस्थांनांच सुनावणीकरीता बोलाविण्यात येवून त्यानुसार या संचालनालयाच्या अभिप्रायांसह शासनामार्फत परिषदेस अभिप्राय/ शिफारस सादर करण्यात येतील याबाबतच्या सूचनाही देण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील ज्या पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या संस्थांमार्फत उपरोक्त लिंक मध्ये माहिती भरलेली असेल किंवा लिंक उपलब्ध झालेली नसल्यामुळे माहिती भरण्यात आलेली नाही, तथापी, आपल्या कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केले आहेत, अशा संस्थांकडून प्रस्तावांच्या अनुषंगाने शासन आदेशानुसार विहित नोंदणी शुल्क / तपासणी शुल्क आकारण्यात यावे. तसेच नवीन पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांची आपल्या स्तरावर संदर्भाधीन क्र.1च्या शासन निर्णयामध्ये नमूद तपासणी शुल्क आकारुन तपासणी करण्यात यावी.

पुढे असेही कळविण्यात येते की, दिनांक 24.12.2012 पर्यंत ऑन लाईन पध्दतीने माहिती भरलेल्या संस्थांसाठी विभागीय कार्यालय, पुणे व नाशिक या विभागांची दिनांक 26.12.2012 व उर्वरित विभागीय कार्यालयातील प्राप्त प्रस्तावांची दिनांक 28.12.2012 रोजी या संचालनालयात सकाळी 11.00 वा. सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी, सदर बाब आपल्या अधिपत्याखालील पदविका अभ्यासक्रमांच्या प्राचार्यांच्या निर्देशनास आणून वर नमूद केलेल्या दिनांकारोजी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत आपल्या स्तरावरुन तात्काळ सूचीत करण्यात यावे. तसेच दिनांक 24.12.2012 नंतर प्राप्त ऑन लाईन अथवा अन्यथा माहिती प्राप्त संस्थांची सुनावणी तसेच वर नमूद केलेल्या नवीन पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांची ~~तपासणी पश्चात~~ सुनावणी तद्नंतर घेण्यात येईल व त्यासाठी स्वतंत्रपणे दिनांक कळविला जाईल.

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

**महत्वाचे**

क्र.तंशिस / प्राकाना / शैवि / पदविका प्रस्ताव सुनावणी / 2012 / 3705
दि. 19 DEC 2012

प्रति,
प्राचार्य,
पदविका संस्था.

उपरोक्त विषयाबाबत वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, नागपूर.